| | | | | |
|---|---|---|---|---|
| **MHPU180021362017** | दाखल दिनांक | ०३ | १० | २०१७ |
| | नोंदणी दिनांक | ०३ | १० | २०१७ |
| | निकाल दिनांक | ०६ | ०६ | २०२६ |
| | कालावधी | वर्षे | महीने | दिवस |
| | | ०८ | ०८ | ०३ |

## भाग 'अ'

| | | |
|---|---|---|
| **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दौंड, ता. दौंड, जि. पुणे यांचे न्यायालयात (न्यायालय क्र.४)**<br>(पिठासीन अधिकारी : ए. एस. शेख) | | |
| **सं.फौ.ख.क्र. ९०३/२०१७** | | **निशाणी क्र. १६ खाली** |
| **गुन्हा नोंद क्रमांक १८४/२०१७,** दि. ०८/०४/२०१७, भा.दं.वि.चे कलम २७९,३३७, ३३८,४२७ तसेच मो.वा. का. कलम १८४. | | **पोलीस ठाणे, दौंड** |
| **अभियोग पक्ष** | :- | शासन तर्फे पो.स्टे. दौंड, ता. दौंड, जि. पुणे. |
| **विधिज्ञ** | :- | विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे. |
| **आरोपी** | :- | पांडुरंग तुकाराम कौळेकर,<br>वयः २८ वर्ष, कामधंदा- वाहन चालक,<br>रा. तळवड, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद. |
| **विधिज्ञ** | :- | विधिज्ञ श्री.आर.पी. जाधव |
| **दोषारोपः- भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये** | | |

## भाग 'ब'

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ०८/०४/२०१७ |
| गुन्हयाची पहीली खबर दाखल दिनांक | :- | ०८/०४/२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | :- | ०३/१०/२०१७ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २५/१०/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | :- | ०३/०१/२०२५ |
| युक्तिवादाचा दिनांक | :- | ०६/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी निश्चित केल्याची तारीख | :- | ०६/०६/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयाचा दिनांक | :– | ०६/०६/२०२६ |
| आरोपी दोषी आढळल्यास, शिक्षा ठोठावल्याचा दिनांक | :– | निर्दोष |

**आरोपीचा तपशिल :–**

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमानत दिनांक | दोषारोप | निर्दोष/ दोषी | शिक्षा | स्थानबध्दता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पांडुरंग तुकाराम कौळेकर | ११/०४/१७ | १२/०४/१७ | २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मो.वा. का. कलम १८४. | निर्दोष | नाही. | नाही. |

**भाग 'क'**

**अभियोग पक्षाने/बचाव पक्षाने/ न्यायालयाने नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी:–**

**अ) अभियोग पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी:–**

| सा.क्र. | निशाणी | साक्षीदारांचे नांव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा. क्र.१ | १६ वर | श्वेता काशिनाथ काकडे | फिर्यादी |
| सा. क्र. २ | १६ वर | अभिजित तुकाराम शितोळे | पंच साक्षीदार |

**ब) बचाव पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी :– नाही.**

**क) न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी :– नाही.**

**अभियोग पक्षाने/ बचाव पक्षाने/ न्यायालयाने सादर केलेले निशाणी यादी :–**

**अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ४० | फिर्याद |
| २. | निशाणी क्र. ४१ | छापील प्रथम खबर अहवाल |

**ब) बचाव पक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | ६३ | मेडिकल रिपोर्ट |

**क) न्यायालय :– नाही.**

**ड) न्यायालयामार्फत निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी :– नाही.**

**मटेरीअल ऑबजेक्ट/महत्वाच्या वस्तु :– नाही.**

## न्यायनिर्णय

( दिनांक ०६/०६/२०२६ )

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये संपरीक्षा चालविण्यात आली. आरोपीविरुध्द नि.क्र.१६ नुसार गुन्हयाचा तपशिल समजून सांगण्यात आला. आरोपीने त्याच्यावरील आरोप नाकारुन संपरिक्षा चालविण्याची मागणी केली.

०२. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर.पी. जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. खालील मुद्दे खटल्याच्या निर्णयासाठी विचारार्थ घेतले आहेत. विषद केलेल्या कारणमिमांसा अन्वये मुद्याचे निष्कर्ष नमूद करण्यात आले आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपीने दिनांक ०८/०४/२०१७ रोजी मौ. कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे येथे पहाटे ३.३० वा त्याच्या ताब्यातील ट्रॅव्हल बस क्र. एम. एच–२५–टी–९९०० हे वाहन सार्वजनिक रस्त्यावर मानवी जिवीतास व इतरांच्या सुरक्षितेस धोका निर्माण होईल इतक्या बेदरकार व हायगयीने चालवून अपघात घडवुन आणला, त्यायोगे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम २७९ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | नकारार्थी |
| ०२) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅव्हल बस क्र. एम. एच–२५–टी–९९०० ने समोरील माल वाहतूक ट्रकला पाठीमागून धडक देऊन अपघात करुन ट्रॅव्हल बस क्र. एम. एच–२५–टी–९९०० मधील | |

| | | |
|---|---|---|
| | प्रवाश्यांच्या किरकोळ दुखापतीस कारणीभूत ठरला म्हणून आरोपीने भारतीय दंड विधानाचे १८६० कलम ३३७ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ०३) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅव्हल बस क्र. एम. एच–२५–टी–९९०० ने समोरील माल वाहतूक ट्रकला पाठीमागून धडक देऊन अपघात करुन ट्रॅव्हल बस क्र. एम. एच–२५–टी–९९०० मधील प्रवाश्यांच्या गंभीर दुखापतीस कारणीभूत ठरला म्हणून आरोपीने भारतीय दंड विधानाचे १८६० कलम ३३८ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ०४) | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्यांच्या ताब्यातील ट्रॅव्हल बस क्र. एम. एच–२५–टी–९९०० बेदरकार व हायगयीने चालवून समोरील माल वाहतूक ट्रकला पाठीमागून धडक देऊन दोन्ही वाहनाचे नुकसान करुन आगळीक केली म्हणून आरोपीने भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४२७ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी |
| ०५) | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं. एम. एच.४२–क्यू–१६५ हा ट्रॉली नं. एम. एच. ४२–ए–८६९८ सह हे वाहन धोकादायक पध्दतीने चालविले म्हणून त्यांनी मोटर वाहन कायदयाचे कलम १८४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ०६) | आदेश काय ? | आरोपीला दोषमुक्त करण्यात येते. |

## – कारणमिमांसा –

०३. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द दोषारोप सिद्ध करण्यासाठी एकूण दोन साक्षदारांची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षाच्या पुराव्याअंती आरोपीविरुध्द गुन्हादर्शक परिस्थिती न्यायालयासमोर आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे

कलम ३१३(१)(ब)अन्वये आरोपीचे निवेदन निशाणी ६४ वर नोंदविण्यात आले. आरोपीने त्याच्या विरुध्दचा दोषदर्शक पुरावा अमान्य करुन त्याच्यावर खोटी खटला दाखल केल्याचा बचाव घेतला आहे. त्यानंतर इतर साक्षीदार तपासण्याची अभियोग पक्षास पुरेशी संधी दिल्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ करीता :-**

०४. सर्व मुद्दयांमधील विवेचन करण्यायोग्य मुद्दे एकच असल्याने त्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता सर्व मुद्दे एकत्रीतरित्या विचारात घेण्यात येत आहेत.

०५. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांची साक्ष याच न्यायनिर्णयाचा भाग असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरीता सदर साक्षी या ठिकाणी पुन्हा नमुद करण्यात आली नाहीत.

०६. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपी याने त्याच्या ताब्यातील वाहन क्र. एम.एच.-२५-टी-९९०० ही बेदरकारपणे व हायगयीने चालवून अपघात घडवला आणि त्यामध्ये वाहनातील प्रवशांना गंभीर व किरकोळ स्वरुपाची दुखापत झाली व वाहनांची अगळीक झाली. भारतीय पुरावा कायदा कलम १०१ नुसार अभियोग पक्षाद्वारे आरोपी घटनेच्यावेळी वाहन चालवत होता, सदर वाहन बेदरकारपणे व हायगयीने चालवीत होता तसेच त्याच्या हायगयीपणामुळे, बेदरकारपणे वाहन चालवल्याने अपघात होऊन फिर्यादी व साक्षीदार यांना गंभीर व किरकोळ दुखापत झाल्याचे सिध्द करणे आवश्यक होते. महत्वाची बाब म्हणजे अभियोग पक्षाद्वारे संपुर्ण खटल्याची भिस्त दोन साक्षीदारांवर ठेवण्यात आली. त्यापैकी साक्षीदार क्र. २ अभिजीत शितोळे यास पंच साक्षीदार म्हणून तपासण्यात आले, परंतू त्याने अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य केले नाही, त्यामुळे त्याची साक्ष अभियोग पक्षास उपयुक्त ठरली नाही. अभियोग पक्षाद्वारे संपूर्ण खटल्याची भिस्त साक्षीदार क्र. १ श्वेता काकडे हिच्या साक्षीवर ठेवण्यात आली. तिने साक्षीमध्ये ती दि.०८/०४/२०१७ रोजी आरोपी चालवत असलेल्या वाहन क्र.

एम.एच.२५–टी–९९०० मध्ये प्रवास करत असताना सदर वाहन चालकाने समोर जाणाऱ्या ट्रकला पाठीमागून धडक दिल्याचे कथन करुन फिर्याद व प्रथम खबरी अहवाल निशाणी ४० व ४१ सिध्द केले. तिच्या साक्षीवरुन आरोपी घटनेच्या वेळी वाहन चालवीत होता ही बाब सिध्द होते परंतू, तिने उलटतपासात मान्य केल्यानुसार ती प्रवासामध्ये झोपेत होती, यावरुन तिने प्रत्यक्ष अपघात होतानाची घटना आणि आरोपीची कृती पाहिली नसल्याचे सिध्द होते. संपूर्ण साक्षीमध्ये तिने आरोपी हा कशा प्रकारे बेदरकारपणे व हायगयीपणे वाहन चालवीत होता याबाबत कोणताही उहापोह केलेला नाही. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन अपघात घडल्याची बाब सिध्द होत असली तरी अपघात ही बाब भा.द.वि. कलम ८० नुसार अपराध या सदरात मोडत नाही. सदर बाब अपराध या सदरात मोडण्याकरीता त्यास बेदरकारपणे व हायगयीपणा याची जोड असणे आवश्यक असते परंतु, साक्षीदार क्र. १ श्वेता काकडे हिच्या साक्षीवरुन आरोपी हा बेदरकारपणे व हायगयीने वाहन चालवीत होता ही बाब सिध्द होत नाही, तसेच अभियोग पक्षाद्वारे बेदरकार व हायगयीपणा सिध्द करण्याकरीता इतर कोणताही साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार तपासण्यात आला नसल्याने घटनास्थळ पंचनामा संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द झालेला नाही. आरोपी पक्षातर्फे निशाणी ६३ नुसार वैद्यकीय प्रमाणपत्रे मान्य करण्यात आली असली तरी सदर दुखापत ही आरोपी याच्या बेदरकार व हायगयीपणामुळे झाली ही बाब सिध्द करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. संपूर्ण प्रकरणाची पाहणी केली असता घटनास्थळ पंचनामा, तपास अभिलेखावर सिध्द झालेला नाही. एकंदरीतच सर्व पुराव्याची पाहणी केली असता आरोपीद्वारे बेदरकारपणे वाहन चालवून फिर्यादी व साक्षीदार यांच्या दुखापतीस आरोपी कारणीभूत ठरला ही बाब सिध्द करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. भा.द.वि. कलम ४२७ नुसार अगळीक सिध्द करण्याकरीता हेतूपुरस्तपणा सिध्द करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे, त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ५ ला नकारार्थी उत्तर नोंदवीत आहे.

**मुद्दा क्रमांक ०६ करीता :–**

०७. आरोपीविरुध्दचे आरोप सिद्ध करण्यात अभियोगपक्षास अपयश आल्याने तो दोषमुक्त होण्यास पात्र आहे. म्हणुन मुद्दा क्र.०६ ला उत्तर खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

०१. आरोपी पांडुरंग तुकाराम कौळेकर यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

०३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या तरतुदी अन्वये आरोपीने रक्कम रुपये १५०००/–(पंधरा हजार रुपये मात्र) चे जामिन कदबा व स्वीय्य बंधपत्र सादर करावे.

०४. सदर गुन्हयातील वाहन क्र. एम.एच.२५–टी–९९०० ही प्रवासी बस मुळ मालकास परत दिली असल्यास सदर ताबा अपील कालावधी पूर्ण झाल्यानंतर कायम करण्यात येतो.

(निकाल खुल्या न्यायालयात टंकलिखीत करुन जाहीर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by AARISH SAIFODDIN SHAIKH
Date: 2026.06.06 13:33:39 +0530

दिनांक– ०६/०६/२०२६.

**( ए. एस. शेख )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कोर्ट क्र.४,
दौंड. ता. दौंड, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | A. S. Shaikh<br>4th Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 4) Daund. |
| Order / Judgment date | :- | 06/06/2026. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 06/06/2026. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 06/06/2026. |